# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट ४१-२३** **दिनांक:- ०६/०२/२०२३**

## Credit Card Reward Point वाढविण्याचे आमिष दाखवून ४,५०,०००/- रूपये फसवणूक रक्कम परत मिळविण्यात सायबर गुन्हे कक्षास यश .

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत अचोळे पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे इसम नामे श्री. दुष्यंत कुमार शर्मा, रा.डी. ४०१, नेमीनाथ टॉवर, एव्हरशाईनसिटी, वसई पुर्व यांना त्यांचे मोबाईलवर **500 Reward Point** वाढविण्यासाठी एस.एम.एस. व एक लिंक प्राप्त झाली होती. सदर लिंकवर तक्रारदार यांनी क्लिक केल्यानंतर त्यांचे क्रेडीट कार्डची माहिती भरली असता तक्रारदार यांचे क्रेडीट कार्डमधून ४,५०,०००/- रुपये काढून घेण्यात आलेबाबत तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे दिनांक ०३/०२/२०२३ चौकशीकामी प्राप्त झाला होता.

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त केली असता तक्रारदार यांची फसवणूक रक्कम रोझरपे या पेमेंट गेटवेद्वारे गेल्याचे दिसून आल्याने तात्काळ नमूद पेमेंट गेटवे कंपन्यासोबत पत्रव्यवहार व पाठपूरावा करुन फसवणूक रक्कम थांबविण्यात आली. तसेच फसवणूक रक्कम ४,५०,०००/- रुपये पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- अशा प्रकारे फसव्या एस.एम.एस. अथवा कॉलला उत्तर देवू नका.
- कॉल आलेल्या व्यक्तीकडे आपले बँक खाते, जन्म दिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करु नये.
- कोणत्याही अनोळखी कॉल आल्यास त्याची विश्वासर्हता पडताळणी करुन घ्यावी.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, सफौ/संतोष चव्हाण, पोलीस अंमलदार प्रविण आव्हाड, मपोअं सुवर्णा माळी व आमिना पठाण, म.सू.ब. आकाश बोरसे, प्रशांत सिरामे, राजेश भरकडे यांनी पार पाडली आहे.

---ooo---